BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

गरीबी, असमानता आणि समावेशक विकास

डॉ. सावन किसन राठोड

संशोधक विद्यार्थी,

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (स्वायत्त), अमरावती.

ईमेल : sawanrathod2012@gmail.com

सारांश :

दारिद्र्य, आर्थिक सामाजिक असमानता आणि समावेशक विकास हे आधुनिक विकास अर्थशास्त्रातील परस्परांशी निगडीत असे महत्वाचे घटक आहे. आर्थिक वाढीचा दर वाढला म्हणजे समाजातील सर्व घटकांच्या जीवनमानात समान प्रमाणात सुधारणा होतेच असे नाही. उत्पन्न, संपत्ती, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान, मूलभूत सुविधा आणि सामाजिक संधी यांच्या वितरणामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्यास आर्थिक वाढीचे फायदे समाजातील काही घटकांपुरते मर्यादित राहू शकतात. म्हणून विकसाचा विचार नुसते राष्ट्रीय उत्पन्न अथवा दरडोई उत्पन्नाच्या वाढीपुरता न करता त्याच्या वितरणात्मक आणि मानवी परिणामांच्या संदर्भात करणे आवश्यक आहे.

दारिद्र्याचे स्वरूपदेखील केवळ उत्पन्नाच्या अभावापुरते मर्यादित राहिलेले नाही. शिक्षण, आरोग्य, पोषण, निवास, स्वच्छता, वीज, सुरक्षित पिण्याचे पाणी आणि जीवनमानातील इतर मूलभूत सुविधांचा अभाव यांचा समावेश बहुआयामी दारिद्र्यात होतो. भारतातील राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकानुसार 2015-16 ते 2019-20 या काळात बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण 24.85 टक्क्यांवरून 14.96 टक्यापर्यन्त कमी झाले. या काळात सुमारे 13.5 कोटी व्यक्ती बहुआयामी दारिद्र्याचे बाहेर आल्याचे यू एन डी पी व नीती आयोग यांच्या विश्लेषणातून नमूद केले आहे.

सदर संशोधनात दारिद्र्य व असमानतेची संकल्पना, प्रकार, परस्पर संबंध, भारतातील स्थिती, बहुआयामी दारिद्र्य, ग्रामीण- शहरी व सामाजिक विषमता, रोजगार व शिक्षणाची भूमिका, सामाजिक संरक्षण व समावेशक विकासाची आवश्यकता यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. समावेशक विकासासाठी उत्पादक, रोजगार निर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षा, आर्थिक समवेशन, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, ग्रामीण पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, आणि वंचित समूहांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

बिज शब्द : बहुआयामी दारिद्र्य, समावेशक विकास, सामाजिक सुरक्षा, आर्थिक समावेशन, मानवी विकास, शास्वत विकास.

प्रस्तावना :

आर्थिक विकास नुसती उत्पादन, उत्पन्न किंव्हा राष्ट्रीय संपत्ती वाढविण्याची प्रक्रिया नसून मानवी जीवनाच्या गुणवत्तेत होणाऱ्या सर्वांगीण सुधारणेची प्रक्रिया आहे. देशाचा सकल उत्पादनाचा दर वाढत असला तरी त्या वाढीचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत समान रीतीने पोहोचत नसेल तर विकासाची प्रक्रिया अपूर्ण राहते. म्हणूनच आधुनिक विकास अर्थशास्त्रात आर्थिक वाढीबरोबरच दारिद्र्य निर्मुलन, असमानता कमी करणे आणि समावेशक विकास या बाबींना विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

दारिद्र्य म्हणजे व्यक्ती किंव्हा कुटुंबाला आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक संसाधनांची कमतरता होय. पारंपारिक दृष्टिकोनातून दारिद्र्य मापन उत्पन्न किंव्हा उपभोगाच्या आधारे केले जाते. मात्र आधुनिक दृष्टिकोणानुसार व्यक्तीचे कल्याण केवळ उत्पन्नावर अवलंबून नसते. शिक्षण, आरोग्य, पोषण, निवास,स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, वीज आणि सामाजिक संधी या घटकांचाही परिणाम होतो. यू एन डी पी च्या बहुआयामी दारिद्र्य पद्धतीत आरोग्य, शिक्षण आणि जीवनमान या प्रमुख आयामांचा विचार केला जातो.

असमानता ही समाजातील व्यक्ती, कुटुंबे, किंव्हा समूह यांच्यामध्ये उपलब्ध संसाधणे, उत्पन्न, संपत्ती, संधी किंव्हा सामाजिक परिणाम यांच्या वितरणातील तफावत दर्शविते. उत्पन्नातील असमानता हा त्यातील एक भाग आहे. शिक्षणतील असमानता, आरोग्य सुविधांतील असमानता, रोजगाराच्या संधीतील तफावत, डिजिटल विभाजन, ग्रामीण-शहरी अंतर आणि लैंगिक असमानता यांनाही व्यापक असमानतेच्या चौकटीत समाविष्ट करणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टामध्ये SDG-10 अंतर्गत देशांतर्गत तसेच देशांमधील असमानता कमी करण्यावर भर देण्यात आल्याचे दिसून येते. या उद्दिष्टात विशेषतः समाजातील खालच्या ४०% लोकसंख्येच्या उत्पन्नवाढीचा दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक करण्याचा आणि सर्व व्यक्तींना सामाजिक, आर्थिक व राजकीय समावेशनाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अधोरेखित होताना दिसून येतो.

भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत या प्रश्नाचे महत्व अधिक असून या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी भारतात माघील काही दशकामध्ये आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा, बँकिंग आणि सामाजिक कल्याण योजनांचा विस्तार झाल्याचे दिसून येते. त्याचवेळी विविध राज्ये, ग्रामीण व शहरी क्षेत्रे आणि सामाजिक आर्थिक समूह यांच्यामध्ये विकासाच्या परिणामामध्ये फरक असल्याचे दिसून येते. त्यामुळे आर्थिक वाढीला व्यापक सामाजिक संधी आणि समान सहभागाची जोड देणे आवश्यक आहे.

संशोधन विषयाची निवड :

भारतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत दारिद्र्य कमी करण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविण्यात आल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने रोजगार हमी, अन्नसुरक्षा, शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, वित्तीय समावेशन, कौशल्य विकास आणि ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी विविध सार्वजनिक धोरणे राबविली जातात. तरीही काही समूहांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य, स्थिर रोजगार, उत्पादक मालमत्ता आणि बाजारपेठेपर्यंत समान प्रवेश मिळत नाही. तसेच दारिद्र्य व असमानता यांचाही परस्पर संबंध महत्वाचा आहे. उच्च असमानता असलेल्या अर्थव्यवस्थेत आर्थिक वाढ झाली तरी तिचे फायदे गरीब समूहापर्यंत पोहोचण्याचा वेग कमी होऊ शकतो. त्याचप्रमाणे दीर्घकाळ दारिद्र्यात राहणाऱ्या कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, आणि कौशलयांमध्ये गुंतवणूक करणे कठीण जाते. त्यामुळे पुढील पिढीमध्ये दारिद्र्य कायम राहण्याची शक्यता वाढते. यामुळे दारिद्र्य आणि विविध प्रकारच्या असमानता कमी करून आर्थिक वाढीचे फायदे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या समावेशक विकास धोरणांची आवश्यकता आहे. इत्यादि बाबींचा तसेच दारिद्र्य व असमानतेच्या संकल्पनांचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन विषयाची निवड करण्यात आली.

संशोधन साहित्याचा आढावा :

१. दत्त आणि राव्हॅलियन (२०११)

गौरव दत्त आणि मार्टिन राव्हॅलियन यांनी २०११ मध्ये प्रकाशित केलेल्या Has India's Economic Growth Become More Pro-Poor in the Wake of Economic Reforms? या संशोधनात भारतातील आर्थिक सुधारणा आणि आर्थिक वाढीचा दारिद्र्यनिर्मूलनावर झालेला परिणाम अभ्यासल्याचे दिसून येते. या अभ्यासानुसार आर्थिक वाढीमुळे

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भारतातील दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली; मात्र आर्थिक सुधारणांनंतर आर्थिक वाढ अधिक प्रमाणात गरीबांच्या हिताची ठरली आहे, असे ठोस पुरावे मिळाले नाहीत. संशोधकांनी उत्पन्नवाढीबरोबर उत्पन्नवितरण आणि ग्रामीण-शहरी आर्थिक वाढीतील फरक यांचाही विचार ककेल्याचे अधोरेखित होते. विशेषतः ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेतील वाढीचे स्वरूप दारिद्र्य कमी होण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकते, असे या अभ्यासातून स्पष्ट होते.

प्रस्तुत संशोधनात दारिद्र्य निर्मूलनासाठी केवळ आर्थिक वाढ पुरेशी नसून तिचे फायदे गरीब आणि वंचित समूहांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, या मुद्द्याच्या विश्लेषणासाठी या अभ्यासाचा उपयोग होतो.

२. अल्कायर आणि सेठ (२०१५)

सबिना अल्कायर आणि सुमन सेठ यांनी २०१५ मध्ये प्रकाशित केलेल्या Multidimensional Poverty Reduction in India between १९९९ and २००६ : Where and How? या संशोधनात भारतातील १९९९ ते २००६ या कालावधीतील बहुआयामी दारिद्र्यातील बदलांचा अभ्यास केल्याचे दिसून येते. संशोधकांनी राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या माहितीच्या आधारे दारिद्र्याचे विविध आयाम तपासले. तसेच उत्पन्नाच्या कमतरतेबरोबरच निवासाची स्थिती, वीज, सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छता यांसारख्या जीवनमानाशी संबंधित निर्देशकांचा विचार केल्याचे दिसून येते. सदर अभ्यासात भारतातील बहुआयामी दारिद्र्यात घट झाल्याचे दिसून आले; तथापि, ही घट विविध प्रदेश, सामाजिक समूह आणि धार्मिक समूहांमध्ये समान प्रमाणात झाली नव्हती. काही वंचित समूहांमध्ये दारिद्र्य कमी होण्याची प्रक्रिया तुलनेने मंद होती. त्यामुळे दारिद्र्य मोजताना उत्पन्नाबरोबरच मूलभूत सुविधांची उपलब्धता आणि सामाजिक विषमता यांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे संशोधकांनी अधोरेखित केल्याचे दिसून येते. या अभ्यासामुळे दारिद्र्याचे बहुआयामी स्वरूप समजून घेण्यास मदत होते. तसेच ग्रामीण-शहरी आणि सामाजिक समूहांमधील दारिद्र्यविषयक फरकांचा अभ्यास करण्यासाठी सैद्धांतिक आधार मिळतो.

३. सिंग (२०१७)

कन्वल डी. पी. सिंग यांनी २०१७ मध्ये प्रकाशित केलेल्या Inclusive Growth and Poverty Reduction: A Case Study of India या संशोधनात भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातील दारिद्र्यनिर्मूलन आणि समावेशक विकासाचा अभ्यास केल्याचे दिसून येते. संशोधकांनी भारतातील दारिद्र्य मोजण्याच्या विविध पद्धती, दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासंबंधीचे वाद आणि दारिद्र्यनिर्मूलनासाठी राबविण्यात आलेल्या धोरणांचा आढावा घेतला असून या अभ्यासात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट केल्याचे दिसून येते. तसेच प्रादेशिक विषमता आणि विविध सामाजिक समूहांमध्ये दारिद्र्य कमी होण्याच्या प्रक्रियेत असलेले फरकही अधोरेखित केल्याचे दिसून येते. आर्थिक वाढीचा लाभ समाजातील दुर्बल घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी समावेशक धोरणांची आवश्यकता असल्याचे या संशोधनातून सूचित होते.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. दारिद्र्य आणि असमानतेच्या संकल्पनांचा अभ्यास करणे.

२. आर्थिक असमानतेचे विविध प्रकार व त्यांची कारणे स्पष्ट करणे

३. दारिद्र्य आणि असमानता यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

४. भारतातील बहुआयामी दारीद्र्याच्या स्थितीचे विश्लेषण करणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

५. समावेशक विकासाच्या संकल्पनेचे स्वरूप व महत्व आभासणे.

संशोधनाची गृहितके :

१. आर्थिक वाढीबरोबर रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संरक्षणाचा विस्तार झाल्यास दारिद्र्य कमी करण्यास मदत होते.

२. उत्पन्न व संपत्तीतील उच्च असमानता आर्थिक विकासाच्या लाभांचे समान वितरण मर्यादित करू शकते.

३. बहुआयामी दारिद्र्याचे निराकरण करण्यासाठी केवळ उत्पन्नवाढ पुरेशी नसून शिक्षण, आरोग्य आणि जीवनमानातील वंचितता कमी करणे आवश्यक आहे.

४. समावेशक विकासासाठी वंचित समूहांना उत्पादन, रोजगार, वित्तीय सेवा आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत प्रभावी सहभागाच्या संधी उपलब्ध आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला असून द्वितीय सामग्रीचे संकलन हे शासकीय अहवाल, संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, दैनिके, व इंटरनेट इत्यादिचा आधार घेऊन करण्यात आले आहेत.

दारिद्र्य : संकल्पना व स्वरूप :

दारिद्र्य ही एक बहुआयामी सामाजिक-आर्थिक समस्या आहे. पारंपारिक अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून दारिद्र्य म्हणजे मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक उत्पन्न किंवा उपभोगाची कमतरता होय. परंतु मानवी विकासाच्या दृष्टिकोनातून दारिद्र्याचा अर्थ व्यक्तीच्या क्षमता आणि संधीच्या अभावासी जोडला जातो. अमर्त्य सेन यांच्या क्षमतादृष्टीकोनानुसार विकास म्हणजे केवळ उत्पन्न वाढणे नसून व्यक्तींना त्यांना मूल्यवान वाटणारे जीवन जगण्यासाठी आवश्यक क्षमता आणि स्वातंत्र्य उपलब्ध होणे होय. या दृष्टिकोनामुळे दारिद्र्याच्या अभ्यास उत्पन्नाच्या पलीकडे नेला जातो.

दारिद्र्याचे प्रकार :

१. सापेक्ष दारिद्र्य :

देशातील उच्चतम ५ किंवा १० टक्के लोकसंख्येची संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाच्या तुलनेत देशातील निम्नतम ५ किंवा १० टक्के लोकसंख्येच्या संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाचे मोजमाप केल्यास त्यास सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. सापेक्ष दारिद्र्यामार्फत देशातील संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाच्या वितरणातील विषमतेचे चित्र अधोरेखित होते. थोडक्यात समाजातील इतर समूहांच्या तुलनेत व्यक्तीचे उत्पन्न किंवा जीवनमान लक्षणीयरीत्या कमी असणे म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय.

२. निरपेक्ष दारिद्र्य :

दारिद्र्याच्या प्रमाणाचे निरपेक्ष मोजमाप करण्यासाठी देशातील जीवनमान खर्चाचा विचार करून त्या आधारावर एक न्यूनतम उपभोग स्तर निर्धारित केला जातो. या स्तरापेक्षा कमी उपभोग करणाऱ्या लोकसंख्येला गरीब समजले जाते. भारतात या निम्नतम उपभोग स्तरालाच दारिद्र्यरेषा असे संबोधतात. अर्थात समाजातील इतर समूहांच्या तुलनेत व्यक्तीचे उत्पन्न किंवा जीवनमान लक्षणीयरीत्या कमी असणे म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य होय.

३) बहुआयामी दारिद्र्य :

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

उत्पन्न व्यतिरिक्त शिक्षण, आरोग्य व जीवनमानातील अनेक वंचिततांचा एकत्रित परिणाम म्हणजे बहुआयामी दारिद्र्य होय.

भारतातील बहुआयामी दारिद्र्य :

भारतामध्ये दारिद्र्य मोजण्यासाठी बहुआयामी दारिद्र्य दृष्टिकोनाला वाढते महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकामध्ये आरोग्य, शिक्षण व जीवनमान या तीन आयामासंबंधित १२ निर्देशांकाचा वापर करण्यात येतो. निती आयोग व यू एन डी पी यांच्या माहितीनुसार १०१५-१६ मध्ये भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण २४.८५% होते. २०१९-२१ मध्ये ते १४.९६% टक्क्यापर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. त्याच काळात ग्रामीण भागातील बहुआयामी दारिद्र्य ३२.५९% वरून १९.२८% टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचे यू एन डी पी ने नमूद केल्याचे दिसून येते.

तथापि, बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण कमी होणे म्हणजे सर्व प्रकारची वंचितता पूर्णपणे समाप्त झाली असे मानता येत नाही. यू एन डी पी च्या २०२४ ग्लोबल एम पी आय मध्ये भारतासाठी उपलब्ध २०१९ ते २०२१ सर्वेक्षणाच्या आधारे १४.४% लोकसंख्या बहुआयामी दारिद्र्यात असल्याचे नमूद केल्याचे दिसून येते. जगातील अति दारिद्र्य मोजण्याच्या दृष्टीने जागतिक बँकेमार्फत 'आंतरराष्ट्रीय दारिद्र्य रेषा' निश्चित करण्यात येते. त्यानुसार भारतासाठी $४.२० प्रतिदिन ही दारिद्र्यरेषा लागू आहे. अर्थात, भारतात $३.०० या अति दारिद्र्यरेषा दर्शवणाऱ्या रेषेखाली सुद्धा मोठी लोकसंख्या आहे. जागतिक बँकेच्या 'Poverty And Equity Brief' या ऑक्टोबर २०२५ मधील अहवालानुसार २०२२-२३ साली भारतातील दारिद्र्याचे प्रमाण $३.०० प्रतिदिन नुसार ५.३% तर $४.२० प्रतिदिन नुसार २३.९% इतके दारिद्र्याचे प्रमाण अधोरेखित केल्याचे दिसून येते.

आर्थिक असमानता : अर्थ व प्रकार

असमानता म्हणजे समाजातील व्यक्ती किंवा समूहांमध्ये उपलब्ध आर्थिक व सामाजिक संसाधनांच्या वितरणातील फरक होय.

असमानतेचे प्रमुख प्रकार :

१. उत्पन्नातील असमानता : वेतन, नफा, व्याज, भाडे व इतर उत्पन्न स्त्रोतांच्या वितरणामध्ये असलेली तफावत म्हणजे उत्पन्नातील असमानता होय.

२. संपत्तीतील असमानता : जमीन, घरे, आर्थिक मालमत्ता, व्यवसाय व इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये असलेली तफावत म्हणजे संपत्तीतील असमानता होय.

३. शैक्षणिक असमानता : गुणवत्ता पूर्ण शाळा, उच्चशिक्षण, डिजिटल साधने व कौशल्य प्रशिक्षण यांचा समान प्रवेश नसल्यास शैक्षणिक असमानता निर्माण होते.

४. आरोग्य विषयक असमान : उत्पन्न, भौगोलिक क्षेत्र व सामाजिक स्थितीनुसार आरोग्य सुविधा व आरोग्य परिणामांमध्ये फरक पडतो. अशावेळी आरोग्य विषयक असमानता निर्माण होते.

५. लैंगिक असमानता : महिला व पुरुषांमध्ये रोजगार, वेतन, मालमत्ता, शिक्षण, निर्णय क्षमता व आर्थिक सहभागात असणारी तफावत म्हणजे लैंगिक असमानता होय.

६ डिजिटल असमानता : इंटरनेट, स्मार्टफोन, डिजिटल कौशल्य व डिजिटल सार्वजनिक सेवांपर्यंत समान प्रवेश नसणे हे आधुनिक अर्थव्यवस्थेतील असमानतेचे नवीन स्वरूप असल्याचे दिसून येते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

दारिद्र्य व असमानता यांचा परस्पर संबंध :

दारिद्र्य आणि असमानता या स्वतंत्र संकल्पना असल्या तरी त्यांच्यात मजबूत परस्पर संबंध असल्याचे अधोरेखित होते. समाजात उत्पन्नाचे वितरण अत्यंत असमान असल्यास आर्थिक वाढीचे फायदे उच्च उत्पन्न असलेल्या समूहांकडे अधिक प्रमाणात जाऊ शकतात. परिणामी गरीब समूहांच्या उत्पन्नात सुधारणा झाली तरी त्यांची सापेक्ष आर्थिक स्थिती फारसी बदलत नाही. दुसरीकडे दारिद्र्यामुळे व्यक्तींना मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक करणे कठीण जाते. गरीब कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण, पोषण किंवा आरोग्य सेवा मिळाली नाही तर त्यांच्या भविष्यातील रोजगार क्षमतेवर परिणाम होतो. अशाप्रकारे दारिद्र्य - कमी मानवी भांडवल – कमी उत्पन्न - पुढील पीडित दारिद्र्य असा दुष्टचक्र निर्माण होऊ शकतो. यामुळे दारिद्र्य निर्मूलनाच्या धोरणात असमानतेचे स्वरूप समजून घेणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होते.

समावेशक विकास :

समावेशक विकास म्हणजे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील विविध आर्थिक, सामाजिक, भौगोलिक व सांस्कृतिक समूहांना सहभागी होण्याच्या समान संधी उपलब्ध करून देणे व विकासाच्या लाभांचे व्यापक वितरण सुनिश्चित करणे होय. देशातील लोकसंख्येचा एक मोठा गट आजही विकासाच्या फायद्यांपासून वंचित आहे. त्यामध्ये मुख्यतः शेतमजूर, सीमांत शेतकरी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व महिला इत्यादींचा समावेश असल्याचे अधोरेखित होते. त्यामुळे सरकारने समावेशी विकासासाठी विविधांगी प्रयत्न केल्याचे दिसून येते. समावेशी विकासाच्या प्रमुख डावपेचांमध्ये दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, आरोग्य, शिक्षण व विविध सामाजिक क्षेत्र पुढाकार, या बाबींचा समावेश होतो. समावेशक विकासाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) सर्वसमावेशक आर्थिक वाढ

२) उत्पादक व सन्मान जनक रोजगार

३) गुणवत्ता पूर्ण शिक्षण

४) परवडणाऱ्या आरोग्य सुविधा

५) सामाजिक संरक्षण

६) वित्तीय समावेश

७) महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

८) ग्रामीण शहरी दरी कमी करणे

९) डिजिटल समावेशन

१०) वंचित समूहांना समान संधी

संयुक्त राष्ट्राच्या SDG-१० मध्ये असमानता कमी करण्यासोबतच सामाजिक, आर्थिक व राजकीय समावेशनाला महत्त्व देल्याचे दिसून येते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

आर्थिक वाढ व समावेशक विकास :

आर्थिक वाढ ही समावेशक विकासासाठी आवश्यक असली तरी ती स्वतःपुरती पुरेशी नाही. वाढीतूनच रोजगारनिर्मिती, सार्वजनिक महसूल व गुंतवणूक वाढू शकते. त्यातून शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा व सामाजिक संरक्षणावर अधिक खर्च करण्याची क्षमता निर्माण होते. मात्र वाढीची रचना महत्त्वाची आहे. जर वाढ मुख्यतः भांडवलप्रधान क्षेत्रात झाली आणि पुरेशा प्रमाणात रोजगार निर्माण झाला नाही तर गरिबी व निम्न कौशल्य कामगारांना तिचा थेट लाभ मर्यादित राहू शकतो. त्यामुळे समावेशक वाढीसाठी वाढ + रोजगार + मानवी भांडवल + सामाजिक संरक्षण + समान संधी या घटकांचा समन्वय आवश्यक असल्याचे अधोरेखित होते.

शिक्षणाची भूमिका :

शिक्षण हे दारिद्र्य कमी करण्याचे आणि सामाजिक गतिशीलता वाढविण्याचे प्रमुख साधन असून गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे व्यक्तीची कौशल्ये, उत्पादकता व रोजगाराच्या संधी वाढतात. मात्र केवळ शाळेत प्रवेश मिळणे पुरेशे नाही. शिक्षणाची गुणवत्ता, डिजिटल सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, उच्च शिक्षणातील प्रवेश व कौशल्याधारित शिक्षण यांचाही विचार करावा लागतो. विशेषतः ग्रामीण, गरीब व सामाजिक दृष्ट्या वंचित कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, डिजिटल साधने, वस्तीगृहे, कौशल्य प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधी वाढविणे आवश्यक आहे.

आरोग्य आणि समावेशक विकास :

आरोग्य हा मानवी भांडवलाचा महत्त्वपूर्ण घटक असून गरीब कुटुंबातील एखाद्या सदस्यावर मोठा वैद्यकीय खर्च झाला तर कुटुंबाची बचत आणि उत्पन्न कमी होऊन ते पुन्हा दारिद्र्यात जाऊ शकते. म्हणून सार्वत्रिक आणि परवडणारी आरोग्यसेवा ही दारिद्र्य विरोधी धोरणाचा महत्त्वाचा भाग असल्याचे अधोरेखित होते. प्राथमिक आरोग्य केंद्र, मातृ व बाल आरोग्य, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी व आरोग्य विमा यांचा विस्तार समावेशक विकासासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. यू एन डी पी च्या भारतावरील Human Development माहिती मध्ये असमानतेमुळे मानवी विकासामध्ये लक्षणीय नुकसान होत असल्याचे दाखविले आहे. २०२२ साठी भारताच्या HDI मध्ये असमानतेशी संबंधित समायोजनानंतर ३१.१% नुकसान नोंदविल्याचे दिसून येते.

रोजगार आणि समावेशक विकास :

दारिद्र्य कमी करण्यासाठी रोजगार हा सर्वात महत्त्वाचा उत्पन्न स्त्रोत आहे. परंतु रोजगारांची संख्या वाढणे पुरेसे नसून त्याची गुणवत्ता देखील महत्त्वाची आहे. समावेशक रोजगारासाठी नियमित व सुरक्षित रोजगार, योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा, कौशल्य विकास, महिला रोजगार, ग्रामीण गैर कृषी रोजगार, सूक्ष्म व लघुउद्योग, स्वयंरोजगार, उद्योजकता विकास यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होते. विशेषतः ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीसोबत प्रक्रिया उद्योग, साठवणूक, वाहतूक, कृषी आधारित उद्योग व सेवा क्षेत्र विकसित झाल्यास उत्पन्नाचे विविध स्त्रोत निर्माण होऊ शकतात.

सामाजिक संरक्षणाची भूमिका :

दारिद्र्य व आर्थिक असुरक्षितता कमी करण्यासाठी सामाजिक संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. रोजगार हमी, अन्नसुरक्षा, सामाजिक पेन्शन, आरोग्य विमा, गृहनिर्माण व विविध कल्याणकारी कार्यक्रम आर्थिक धक्क्यांपासून गरीब कुटुंबाचे संरक्षण करू शकतात. निती आयोगाच्या SDG-१ माहितीनुसार २०२३-२४ मध्ये मनरेगा अंतर्गत रोजगाराची मागणी करणाऱ्या व्यक्तींमध्ये ९९.७% व्यक्तींना रोजगाराची ऑफर करण्यात आल्याचे नमूद असून त्याच स्त्रोतामध्ये २०२२-२३ पर्यंत बहुआयामी दारिद्र्य आणखी कमी झाल्याचा अंदाजही नोंदविल्याचे दिसून येते. तथापि, सामाजिक योजनांची प्रभावीता

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

केवळ अर्थसंकल्पीय तरतुदींवर अवलंबून नसून लक्ष्यीत व्यक्तींपर्यंत लाभ पोहोचण्याची गुणवत्ता, प्रशासन, जागरूकता व स्थानिक पातळीवरील अंमलबजावणीवरही अवलंबून असल्याचे अधोरेखित होते.

वित्तीय समावेशन आणि डिजिटल अर्थव्यवस्था :

बँक खाते, डिजिटल पेमेंट, कर्ज, विमा व बचत सुविधा उपलब्ध झाल्याने गरीब कुटुंबांना औपचारिक आर्थिक व्यवस्थेत प्रवेश मिळतो. वित्तीय समावेशनामुळे अनौपचारिक सावकारांवरील अवलंबित व कमी होण्यास, बचत वाढण्यास व छोट्या व्यवसायांना भांडवल उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते. परंतु डिजिटल अर्थव्यवस्थेत डिजिटल साक्षरता, इंटरनेटची उपलब्धता, सायबर सुरक्षा व तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे वित्तीय समावेशनासोबत डिजिटल समावेशनावरही लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

ग्रामीण शहरी असमानता :

भारताच्या विकास प्रक्रियेत ग्रामीण आणि शहरी क्षेत्रांमध्ये रोजगार, उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, डिजिटल सुविधा व बाजारपेठेच्या उपलब्धतेमध्ये फरक पडू शकतो. ग्रामीण समावेशक विकासासाठी ग्रामीण रस्ते व वाहतूक, सिंचन, कृषी प्रक्रिया, बाजारपेठ प्रवेश, शीतसाखळी, ग्रामीण उद्योग, इंटरनेट सुविधा, कौशल्य प्रशिक्षण, आरोग्य व शिक्षण सुविधा इत्यादी बाबींना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात उत्पादनक्षमता वाढविण्याबरोबरच कृषी बाह्य रोजगार निर्मिती केली तर ग्रामीण उत्पन्नाचे स्त्रोत अधिक विविध होऊ शकतात.

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण :

समावेशक विकासामध्ये महिलांचा आर्थिक सहभाग महत्त्वपूर्ण आहे. महिलांचे शिक्षण, कौशल्य, सुरक्षित रोजगार, समान वेतन, कर्ज, मालमत्ता मालकी व उद्योजकतेच्या संधी मिळाल्यास कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. महिला स्वयंसहायता गट, सूक्ष्म वित्त, ग्रामीण उद्योग, डिजिटल वित्त आणि कौशल्य प्रशिक्षण याद्वारे महिलांच्या आर्थिक सहभागाला चालना मिळू शकते. लैंगिक असमानता कमी करणे हे केवळ सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट नसून मानवी भांडवलाचा अधिक कार्यक्षम वापर करण्यासाठीही महत्त्वाचे असल्याचे दिसून येते.

शाश्वत आणि समावेशक विकास :

समावेशक विकास शाश्वत विकासापासून वेगळा करता येत नाही. पर्यावरणीय ह्रासाचा परिणाम गरीब समूहांवर तुलनेने अधिक होऊ शकतो कारण त्यांचे उत्पन्न नैसर्गिक संसाधनांवर अधिक अवलंबून असते. हवामान बदल, दुष्काळ, पूर, उष्णतेच्या लाटा, पिकांचे नुकसान, आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे गरीब कुटुंबाची आर्थिक असुरक्षितता वाढू शकते. त्यामुळे समावेशक विकासामध्ये हवामान लवचिक शेती, जलसंधारण, अक्षय ऊर्जा, शाश्वत शेती, आपत्ती व्यवस्थापन व हरित रोजगार यांचा समावेश करणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होते.

भारतातील समावेशक विकासासमोरील आव्हाने :

भारतामध्ये दारिद्र्य कमी करण्याच्या दिशेने प्रगती झालेली असली तरी समावेशक विकासासमोर काही महत्त्वाची आव्हाने असल्याचे दिसून येते.

१) अनौपचारिक व अस्थिर रोजगारामुळे उत्पन्नाची सुरक्षितता कमी राहू शकते.

२) उद्योगांच्या गरजा व उपलब्ध कामगारांची कौशल्य यामध्ये आंतर असू शकते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

३) शिक्षणात प्रवेश वाढला तरी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उपलब्धता सर्व भागात समान नसू शकते.

४) गरीब कुटुंबांना आरोग्य खर्चामुळे आर्थिक धक्का बसू शकतो.

५) राज्य आणि जिल्ह्यांमध्ये विकासाच्या पातळीत फरक दिसून येतो.

६) डिजिटल सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यांचा वापर करण्याची क्षमता सर्व समूहांमध्ये समान नाही.

७) काही सामाजिक समूहांना ऐतिहासिक आणि संरचनात्मक कारणांमुळे समान संधी मिळण्यात अडथळे येऊ शकतात.

निष्कर्ष :

१) उत्पन्नाची कमतरता ही दारिद्र्याची एक बाजू आहे. शिक्षण, आरोग्य व जीवनमानातील वंचिततांचाही विचार आवश्यक आहे.

२) यू एन डी पी - नीती आयोगाच्या राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकानुसार २०१५-१६ ते २०१९-२१ दरम्यान बहुआयामी दारिद्र्य २४.८५% वरून १४.९६% पर्यंत कमी झाले आहे.

३) आर्थिक वाढ आणि समावेशकता यांच्यात समन्वय आवश्यक आहे. GDP वाढ स्वतःहून समान विकास सुनिश्चित करत नाही.

४) शिक्षण व आरोग्य हे दारिद्र्य निर्मूलनाचे मूलभूत आधार आहेत.

५) रोजगार हा दारिद्र्य कमी करण्यासाठी केंद्रस्थानी आहे.

६) गरीब कुटुंबांना आर्थिक धक्क्यांपासून संरक्षण देण्यासाठी सामाजिक सुरक्षा महत्त्वाची आहे.

७) असमानता ही केवळ उत्पन्नाशी संबंधित नाही.

८) वंचित समूहांना केवळ कल्याणकारी योजनांचे लाभार्थी न मानता उत्पादन, रोजगार, उद्योजकता व निर्णय प्रक्रियेत सहभागी बनविणे आवश्यक आहे.

९) पर्यावरणीय आणि हवामान विषयक जोखमींचा गरीब समूहांवर मोठा परिणाम होऊ शकतो.

१०) दारिद्र्य, असमानता व समावेशक विकास हे आधुनिक अर्थव्यवस्थेतील परस्परावलंबी प्रश्न आहेत. आर्थिक विकासाचा अंतिम उद्देश केवळ उत्पादन आणि उत्पन्न वाढविणे नसून व्यक्तींना अधिक चांगले, सुरक्षित, सन्मान जनक व संधी पूर्ण जीवन जगण्याची क्षमता उपलब्ध करून देणे हा असला पाहिजे.

उपाययोजना :

१) कामगार प्रधान उत्पादन क्षेत्रांना आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

२) प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत गुणवत्ता, कौशल्य व डिजिटल क्षमता वाढविण्यावर भर द्यावा.

३) प्राथमिक आरोग्य सेवा मजबूत करून गरीब व ग्रामीण कुटुंबांचा आरोग्यावरील आर्थिक भार कमी करावा.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

४) वृद्ध, दिव्यांग, बेरोजगार, असंघटित कामगार व अत्यंत गरीब कुटुंबांसाठी सामाजिक संरक्षण प्रभावी करावे.

५) महिलांसाठी कौशल्य, कर्ज, बाजारपेठ व सुरक्षित रोजगाराच्या संधी वाढवाव्यात.

६) शेतीसोबतच प्रक्रिया उद्योग, ग्रामीण सेवा व गैर कृषी रोजगार वाढवावा.

७) बँकिंग, विमा, कर्ज आणि डिजिटल सेवांचा सर्वसमावेशक विस्तार करावा.

८) विकासात मागे असलेल्या जिल्ह्यांसाठी क्षेत्र विशिष्ट धोरणे तयार करावीत.

९) उत्पन्नाबरोबर शिक्षण, आरोग्य, पोषण, निवास, स्वच्छता व डिजिटल प्रवेश यांचेही नियमित मापन करावे.

१०) सरकारी योजनांचे मूल्यमापन केवळ खर्चावर न करता प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलांवर आधारित असावे.

संदर्भसूची :

1. Alkire, S., & Foster, J. (2011). Counting and multidimensional poverty measurement. Journal of Public Econimics, 95(7-8), 476-478.
2. NITI Ayog. (2023). National Multidimentional Poverty Index : A Progress Review 2023. Government of India.
3. Niti Ayog. (2024). SDG India Index 2023-24. Government of India.
4. Sen, A. (1999). Development as Freedom. Oxferd University Press.
5. United Nations. (2026). Goal 10: Reduced Inequalities. United Nations Sustainable Development Goals.
6. United Nations Development Programme. (2023). National Multidimensional Poverty Index: A Progress Review2023. UNDP India.
7. United Nations Development Programme. (2024). 2024 Global Multidimensional Poverty Index: Poverty amid Conflict. UNDP.
8. United Nations Development Programme. (2024). Human Development Report 2023/24. UNDP
9. वडेर विरेन्द्र, (२०१३). दारिद्र्य संकल्पना मापन व वास्तव शिवार्थ स्मरणिका पृ. ५७
10. रायखेलकर ए. आर, व बी. एच. दामजी, (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिकेशर्ष औरंगाबाद
11. Economic Survey 2025-26